महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ जून, २०१३

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन



VERSATILE SCHOOL
PRINCIPAL

Scanned with OKEN Scanner

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना हेतुपत्र (Letter of Intent) व शाळा मान्यता प्रमाणपत्र (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयाच्ये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)** अधिनियम, २०१२ पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय -</u>**

(१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |



Scanned with OKEN Scanner

(२) शाळा दर्जावाढीच्या ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची परवानगी देण्यात येत आहे.

(३) नवीन शाळांचे प्रस्ताव - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या ११७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.



VERSATILE SCHOOL
PRINCIPAL

Scanned with OKEN Scanner

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

Kuldeep Mashe I G R Self Finance 13 06 2013

VERSATILE SCHOOL
PRINCIPAL

Scanned with OKEN Scanner

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
विभागातंर्गत सर्व संचालक.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती माशि - १.

ळेचा
ग्गार
मेक
क

VERSATILE SCHOOL
PRINCIPAL

Kuldeep/Mashi I/G R Self Finance 13 06 2013



Scanned with OKEN Scanner